प्रकरण पहिले

# शरणकुमार लिंबाळे यांचे वाङ्मयीन चरित्र


प्रास्ताविक

१.१) शरणकुमार लिंबाळे यांचे जीवनचरित्र

१.२) जीवनसंस्कार

१.३) शरणकुमार लिंबाळे यांचे कादंबरीलेखन

१.४) शरणकुमार लिंबाळे यांचे काव्यलेखन

१.५) शरणकुमार लिंबाळे यांचे समीक्षालेखन

१.६) शरणकुमार लिंबाळे यांचे आत्मकथालेखन / स्वकथन

१.७) शरणकुमार लिंबाळे यांचे कथालेखन

१.८) शरणकुमार लिंबाळे यांचे संपादित साहित्य

१.९) शरणकुमार लिंबाळे यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन

१.१०) शरणकुमार लिंबाळे यांचा जीवनविषयक दृष्टिकोन

प्रकरण पहिले

# शरणकुमार लिंबाळे याचे वाङ्मयीन चरित्र

## प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपल्याला शरणकुमार लिंबाळे यांचे जीवनचरित्र व वाङ्मय लेखनाचा स्थूलमानाने परिचय करून घ्यायचा आहे. लेखकाच्या वाङ्मयीन कृतीचा अभ्यास करत असताना त्याच्या लौकिक जीवनाचा वेध घेणे हाही एक अभ्यासाचा विषय ठरतो. लेखक शरणकुमार लिंबाळे यांच्या जीवनानुभवाचे नाते थेट त्यांच्या वाङ्मयाशी जोडले गेलेले आहे. लेखकाच्या जीवनात आलेले चढउतार, भोगाव्या लागणाऱ्या यातना यांचे कडू गोड अनुभव, जीवनसंस्कारांचे साद- पडसाद त्यांच्या वाङ्मयातून उमटत असतात. लेखक आपल्या मनातील विचारांना साहित्यकृतीच्या माध्यमातून प्रगट करीत असतो. शरणकुमार लिंबाळेंचे जीवनचरित्र व लौकिक जीवनासंबंधी विचार करीत असताना त्यांचा जन्म, बालपण, शिक्षण, जीवनसंस्कार, व्यवसाय, लेखन आदींचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. त्याचबरोबर त्यांना मिळालेले विविध पुरस्कार, त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन, साहित्य विषयक दृष्टिकोन यासंबंधी विचार करणे उचित ठरेल.

## १.१. शरणकुमार लिंबाळे यांचे जीवनचरित्र :

शरणकुमार लिंबाळे यांचा जन्म महाराष्ट्र व कर्नाटकच्या सीमेवर वसलेल्या अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर या गावी १ जून १९५६ मध्ये दलित कुटुंबात झाला. त्यांचा जन्मच अनैतिक ठरल्यामुळे त्यांना जन्मापासूनच 'अक्करमाशी' म्हणून हिणवण्यास सुरुवात झाली. त्यांचा जन्म दलित समाजात झाल्याने त्यांना जातीविषयी टोमणेही शाळेत ऐकून घ्यावे लागत. मानवप्राण्याला कोणतीही का होईना एक जात असते. त्या जातीच्या कवचाखाली त्यांची सुखदु:खे बंदिस्त असतात. परंतु उपेक्षितांनीही उपेक्षा केल्यामुळे शरणकुमार लिंबाळे यांच्या दु:खाला वेगळे रुप प्राप्त झाले. धर्माधिष्ठित जातीय पद्धती, वर्णभेद यातून दलितांची दु:खे निर्माण झाली. परंतु ज्या कारणांमुळे हजारो वर्षांपासून या

15

पिढ्यानपिढ्या भोगत असलेल्या दु:खाला त्यांनी झुगारून दिले, त्यांनीही सोसू नये,असे दु:ख लिंबाळे यांच्या वाट्याला आले. या प्रकारचे जीणे वाट्याला आलेल्या लिंबाळेंना पहिले दु:ख वाटते ते 'अक्करमाशी' म्हणून झालेल्या अवहेलनेचे. आपला जन्मच अनैतिक ठरला ही बोचणीच त्यांना अधिक जाणवते. मसामाय ही लिंबाळेंची आई व विठ्ठल कांबळेंची पत्नी. हणमंता लिंबाळेशी अनैतिक संबंध ठेवल्याने मसामायीचा विठ्ठल कांबळेशी मांडलेला संसार उद्ध्वस्त होतो. मसामायीला दोन मुलं होऊनसुद्धा नवरा तिला सोडतो. अशा वेळी मसामाय एकटी पडते आणि समाजाचा रोष पत्करून हणमंता लिंबाळेची रखेल बनते. कालांतराने मसामायीला मुलगा होतो. हा मुलगा म्हणजेच लेखक शरणकुमार लिंबाळे. परंतु हणमंता लिंबाळे त्यांचे पितृत्व नाकारतो आणि इथूनच त्यांच्या आयुष्याची परवड सुरू होते. समाजाबरोबरच त्यांच्या स्वत:च्या कुटुंबातही त्यांना उपरेपणाची जाणीव होते. त्याच्या मनात असंख्य विचारांचे वादळ उठते; अनेक प्रश्न अस्वस्थ करतात. आपल्या आईच्या हातून ही अनैतिक गोष्ट का घडली ? आपल्या हक्काचा बाप कोण ? हे दोन प्रश्नच त्यांना अधिक भेडसावतात. आपली आई स्वत: कलंकिणी ठरली आणि पोटच्या मुलाच्या कपाळालाही 'अक्करमाशी'चा कलंक लागला. आपण अक्करमाशी आहोत ही जाणीव जसजशी वाढत जाते, तसतशी आईविषयीची द्वेषभावनाही लेखकाच्या मनात वाढत जाते. लेखकाचे पालनपोषण त्याची आजी संतामाय करते. लहानपणी लेखकाने घेतलेले भूक, दारिद्रय आणि उपासमारीचे अनुभव विदारक आहेत. लहानपणी भीक मागून किंवा आजीने जोगवा म्हणून मागून आणलेल्या भाकरीच्या तुकड्यावर भूक भागवावी लागे, तर कधी कधी पाणी पिऊन दिवस काढावे लागत. लेखक लहानपणी भूक लागली म्हणून रडतो तेव्हा आजी गावातून भाकरी मागून आणते. तेव्हा लेखक म्हणतो "संतामायीची वटी स्वर्गावाणी वाटायची".[१] दारिद्रयाचे भीषण चटके घेत लेखक प्रथम शाळेत प्रवेश करतो तेव्हा त्याला महार म्हणून हिणवले जाते. लेखकाला 'अस्पृश्य' म्हणून आलेले अनुभव विदारक वाटतात. गरिबीचं गहिरे दु:ख पचवून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. अक्षरांच्या मदतीने आयुष्यातील कडू अनुभवांचा अर्थ शोधण्याचा

प्रयत्न लेखकाने केला. अस्पृश्य असल्यामुळे समानतेची तर सोडाच पण साध्या सहानुभूतीची वागणूकदेखील मिळणे शक्य नव्हते. अस्पृश्यांच्या मुलांना पाण्याप्रमाणे शिक्षणही वरूनच वाढले जायचे. सरस्वती बाटेल याची उच्चवर्णीय शिक्षकाला भीती वाटायची. त्यावेळी शिक्षकदेखील समाजव्यवस्थेचा बळी होता. शिक्षण घेत असताना चपलांच्या ढिगाजवळ, दरवाजाजवळ बसून शिक्षण घ्यावं लागे. अशा परिस्थितीत प्राथमिक शिक्षण हन्नूरमध्ये पूर्ण केले. हन्नूरपासून ३ मैल लांब असणाऱ्या चुंगी या गावी त्यांनी नववी इयत्ता पूर्ण केली. खांद्यावर दप्तराचं ओझ घेऊन चालावं लागायचं, याचा हिवाळ्यात खूप त्रास व्हायचा, म्हणून लेखक शाळा चुकवायचा त्यामुळे पुढील शिक्षण त्यांनी वसतिगृहामध्ये राहून चपळगावच्या हायस्कूलमध्ये पूर्ण केले. वसतिगृहात सवर्ण व दलित मुले एकत्र रहायची, जेवायची, खेळायची, यामुळे सवर्णांविषयीची भीती नष्ट होत होती. ओळखीच्या सवर्ण मुलांबरोबर केलेला उनाडपणा, सवर्णांची केलेली टिंगल, अभ्यासाने सवर्ण मुलांवर केलेली मात यांमुळे बालपणापासून मनात साचलेला न्यूनगंड नष्ट होऊ लागला. चपळगावच्या हायस्कूलमध्ये दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील कॉलेज शिक्षणासाठी दयानंद महाविद्यालय, सोलापूर येथे प्रवेश घेतला. कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना अवांतर वाचनास वेळ मिळाला. त्यावेळी कामगार नाट्यस्पर्धा व्हायच्या. यातूनच लिखाणाची प्रेरणा मिळाली आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढण्याचे सामर्थ्यही शिक्षणाने मिळाले. अशातच नाटक आणि भीमगीते लिहिण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर वर्तमानपत्रात वाचकांची पत्रेही लिहिणे सुरू केले होते. आठवड्यातून दोन-चार पत्रे वर्तमानपत्रातून प्रकाशित व्हायची. ही लेखकाची लेखनातील पहिली उमेदवारी होती. लिखाण चालू असतानाच १९७८ मध्ये शिवाजी विद्यापीठामधून बी.ए. ची इंग्रजी विषयासह पदवी मिळवली. बी.ए. तृतीय वर्षाला असतानाच त्यांचे कुसुमताईशी लग्न झाले आणि थोड्या दिवसांतच 'टेलिफोन ऑपरेटर' म्हणून अहमदपूरला नोकरी मिळाली. अहमदपूरला राहून नोकरी करत असतानाच त्यांनी १९९० ला मराठी विषयातून एम.ए. ची पदवी मिळवली. टेलिफोन ऑपरेटरच्या नोकरीत पुरेसा पगार नव्हता, वाचनाची आवड असूनसुद्धा मनासारखे वाचता येत नव्हते. दारिद्र्य

संपवण्यासाठी सतत नव्या नोकरीसाठी अर्ज करत असतानाच त्यांना सोलापूर आकाशवाणी केंद्रात उद्घोषकाची नोकरी मिळाली. या नोकरीत चारशे रुपयांनी पगार वाढला होता. पण आवाज, उच्चार, बोली व्यवस्थित नसल्यामुळे प्रसारणावरही परिणाम व्हायचा व श्रोत्यांकडून तक्रारीची पत्रे यायची.आकाशवाणीतील ही नोकरीही नीरस वाटू लागल्यामुळे याही नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. लेक्चरर्च्या जागेसाठी मुलाखत देत असताना गुड अकॅडॅमिक रेकॉर्डचा मुद्दा उपस्थित राहिल्याने शिवाजी विद्यापीठात पीएच.डी. साठी 'दलित साहित्याच्या समीक्षेचा अभ्यास' या विषयासाठी नोंदणी केली. पीएच.डी. प्रबंधाचे काम सुरू असतानाच नेट परीक्षाही उत्तीर्ण झाले. याच काळात 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' या पक्षाचे अध्यक्ष ना. रामदास आठवले समाजकल्याणमंत्री असताना त्यांच्या मुंबई येथील कार्यालयात 'स्वीय सहाय्यक' म्हणून नोकरी मिळाली. मंत्रालयातल्या नोकरीने अभूतपूर्व बदल झाल्याने आत्मविश्वासाला उजाळाही मिळत होता. पीएच.डी. चा प्रबंध पूर्ण होऊन १९९६ ला पीएच.डी.ची पदवीही संपादन केली. निवडणुका झाल्या, भाजप शिवसेनेचे सरकार सत्तेवर आले आणि लेखनिकाची नोकरी गेल्यामुळे मुंबई सोडून परत मुक्त विद्यापीठात मूळ पदावर रुजू व्हावे लागले. कालांतराने मुक्त विद्यापीठाने पुणे विभागाचा विभागीय संचालक म्हणून नेमणूक केली. या काळात त्यांना कीर्ती व प्रतिष्ठा मिळाली. त्यांना अस्मिता, अनघा व अनार्य अशी तीन मुले आहेत. या सर्वांबरोबरच त्यांच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले.

## १.२ जीवनसंस्कार :

शरणकुमार लिंबाळे यांचा जन्म अस्पृश्य दलित कुटुंबात झाला होता. जन्मतःच 'अक्करमाशी' हा कलंकही लागल्याने त्यांच्यावर जाणीवपूर्वक जीवनसंस्कार झाले नाहीत, परंतु कॉलेज जीवनात निर्माण झालेली अवांतर वाचनाच्या सवयी, लिखाणाला केलेली सुरुवात व त्यातून झालेली साहित्यनिर्मिती यामुळे त्यांचे जीवन संस्कारमय झाले. आकाशवाणीतल्या नोकरीमुळे दयानंद महाविद्यालयातील प्राचार्य बनसुडे यांच्याकडून

एम.ए. होण्याची प्रेरणा मिळाली. संस्कारक्षम वयात नसेल परंतु कॉलेज जीवनात मात्र त्यांना चांगला मित्रपरिवार मिळाला. मनुष्याच्या जीवनात चांगली संगत फार महत्वाची असते. संगत योग्य असेल तरच माणूस सुधारू शकतो. जर संगत व्यवस्थित नसेल तर माणसाचे आयुष्य बरबाद व्हायला वेळ लागत नाही. योग्य संगतीतूनच माणसाची जडणघडण होत असते.

अहमदपूरला टेलिफोन एक्सचेंजमध्ये नोकरीला असताना तेथे सुधीर गव्हाणे हे टेलिफोन ऑपरेटर व लेखकही होते. त्यांच्यामुळे लिंबाळेंच्या लेखनास गती मिळाल्याने ते दलित साहित्याकडे वळले. त्यातूनच दलित कविता लिहिण्याची प्रेरणा मिळाली. सुधीर गव्हाणे सवर्ण असूनही दलितांच्या बाजूचे होते. म्हणूनच त्यांनी लिंबाळेंच्या कविता अस्मितादर्शकडे पाठवून प्रकाशित केल्या. स्वत:च्या लेखनात किंवा भाषणातसुद्धा ते लिंबाळेंच्या कविता वापरत असत. इथूनच 'दलित कवी' म्हणून शरणकुमार लिंबाळेंचा उल्लेख होऊ लागला. दलित कादंबरीकाराबरोबर दलित कवी म्हणून प्रसिद्धीही मिळाली. मुंबईला समाजकल्याणमंत्री रामदास आठवले यांचा 'स्वीय सहाय्यक' म्हणून नोकरी करताना लिंबाळेंच्यात अभूतपूर्व बदल झाला. सत्तेच्या मर्यादा आणि मोठेपणा जवळून अनुभवता आला. शिक्षणामुळे, वाचनामुळे, नोकरीमुळे लिंबाळेंच्यावर झालेले उत्तम संस्कार त्यांच्या आयुष्याला वळण देऊ शकले.

## १.३ शरणकुमार लिंबाळे यांचे कादंबरीलेखन :

एक आघाडीचे दलित कार्यकर्ते म्हणून लेखक शरणकुमार लिंबाळे अधिक परिचित आहेत. डॉ. आंबेडकरांच्या कार्याने प्रेरित होऊन कॉलेजजीवनापासूनच त्यांनी दलित चळवळ व दलित पँथरमध्ये स्वत:ला झोकून दिले. त्याबरोबरच त्यांनी आपले वाङमयीन लेखनही चालूच ठेवले. सुरुवातीला त्यांचा 'उत्पात' हा काव्यसंग्रह १९८२ मध्ये प्रकाशित झाल्यावर लिखाणातला आत्मविश्वास वाढला आणि आपल्या जीवनाची करुण कहाणी

'अक्करमाशी' या पुस्तकाद्वारे मांडण्याचा प्रयत्न केला. यातूनच त्यांच्या कादंबरीलेखनाला गती मिळाल्याने 'भिन्नलिंगी' ही कादंबरी आकारास आली.

- **भिन्नलिंगी :**

'अक्करमाशी' पूर्वी लिहिलेली 'दंगल' आणि 'बारामाशी' नंतर लिहिलेली 'परपुरुष' एकत्र करून 'भिन्नलिंगी' ही कादंबरी प्रचार प्रकाशन, कोल्हापूर यांनी १९९१ मध्ये प्रकाशित केली. १९८० नंतरच्या वैशिष्ट्यपूर्ण लघुकादंबऱ्या म्हणून 'भिन्नलिंगी' मधील 'दंगल' व 'परपुरुष' या दोन कादंबऱ्या महत्वपूर्ण ठरतात. 'दलित पँथर' या चळवळीतील दुही आणि दडपशाहीवर आधारित 'दंगल' ही कादंबरी विकसित झाली. प्रथम ही कादंबरी अस्मितादर्शच्या दिवाळी अंकामधून प्रसिद्ध झाली. एकिकडे 'दलित पँथर' मधले रामा, नंदा, जयश्री हे खरे कार्यकर्ते सवर्णांनी केलेल्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध निषेध, मोर्चा, आंदोलने करतात. तर त्यामधीलच कांबळें सारखा एखादा पँथरचा अध्यक्ष प्राध्यापकी सांभाळून पुढारीपणाची हौस मिरवताना दिसतो. वरून पुढारीपणाचा आव आणणारा पण दलितांविषयी खरीखुरी तळमळ नसणारा, अन्यायाला वाचा फोडण्यापेक्षा लाच खाऊन प्रकरण मिटविणारा कांबळे हा प्राध्यापक आहे. तर दुसरीकडे रामा बग्गा हा बी.ए. झालेला तरुण स्वत:च्या आईच्या आजारपणाकडे दुर्लक्ष करून पँथरमध्ये सर्वस्व झोकून देतो. आईचं आजारपण बळावल्यावर तो आईला मुंबईला संभाजी शिंदे या मित्राकडे दवाखान्यात जाण्यासाठी घेऊन येतो. पण त्या रात्री आईचे आजारपण जास्त होते. आईला टॅक्सीने दवाखान्यात नेत असतानाच रामाच्या मांडीवर डोके ठेवून आई रामला म्हणते, 'राम, मला आता आपल्या माणसांत घेऊन चल.'[२] असे म्हणत तिचा औषधांविना जीव जातो व रामा पोरका होतो.

थोडक्यात, रामा या दलित कार्यकर्त्याच्या अनुभवांतून 'दंगल' ही कादंबरी विकसित होते. घरातील मायेचे आजारपण, गरिबी, दारिद्र्यामुळे तिला नीट औषधपाणी करता येत नाही याची खंत, सुमीबरोबर लग्न करण्याची इच्छा, शिकून एम.ए. व्हावे व

प्राध्यापकाची नोकरी करून घरातील दारिद्र्य कमी करावे, ही रामची खाजगी स्वप्ने एकिकडे आहेत, तर दुसरीकडे दलित पँथरची चळवळ, मोर्चे ही दुसरी बाजू आहे. चळवळीत काम करताना आलेले अनुभव हे त्याला वेगळेच भान आणून देतात हा 'दंगल'चा मुख्य विषय आहे.

जीवनातील 'चळवळींचा कार्यकर्ता' ही अवस्था संपते आणि नोकरी करून त्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो. आयुष्यात त्याला काही नवीन जीवघेणे अनुभव येतात. त्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्याच्या मनातील चंगळवादी वृत्ती ह्या 'परपुरुष' चा मुख्य विषय आहे. ही कादंबरी आत्मनिवेदनांतून प्रकट होते. नायकाचा मानसिक कोंडमारा व भावनिक घुसमट इथे प्रामुख्याने व्यक्त होते.

- **उपल्या :**

दलित साहित्यामध्ये कथा, नाटक, काव्य, आत्मकथन विपुल प्रमाणात लिहिले गेले पण दलित कादंबरी हा प्रांत उपेक्षित राहिल्याने शरणकुमार लिंबाळेनी 'भिन्नलिंगी' या कादंबरीपासून दलित कादंबरी लिहिण्याकडे लक्ष केंद्रित करून दलित कादंबरीची उणीव भरून काढण्याचा प्रयत्न केला. 'उपल्या' ही कादंबरी १९९८ मध्ये दिलीपराज प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केली. 'उपल्या' या कादंबरीचा हिंदी अनुवाद 'युद्धरत आम आदमी' या मासिकात क्रमशः प्रकाशित झाला. हा अनुवाद निशिकांत ठकार यांनी केला होता. राधाकृष्ण प्रकाशन नवी दिल्ली यांनी 'उपल्या'च्या हिंदी अनुवादाचे 'नरवानर' या नावाने २००३ मध्ये पुस्तक प्रकाशित केले. ही कादंबरी पूर्णतः काल्पनिक कथा, आत्मकथा, डायरी आणि कादंबरी अशा वाङ्मयप्रकारांचा वापर करून लिहिली आहे. 'उपल्या' या कादंबरीला राजकीय आशयसूत्र आहे. कादंबरीचे 'उपल्या' हे नाव वानरांमधील एका जातीवरून दिलेले आहे. वानरांच्या टोळीचा नायक नर असतो. तो आपल्या टोळीत नर पिल्लू जन्माला आले की, त्याला ठार मारतो. मादी जन्माला आली की त्याला आनंद होतो. कारण, आपल्या टोळीत आपण एकटेच नर असावे, भोगात दुसरा भागीदार नको अशी जी

वृत्ती वानरांत असते तिला 'उपल्या' म्हणतात.[३] दलित चळवळीतही या पद्धतीने उपल्यांचा वावर दिसतो. या पार्श्वभूमीवर ही कादंबरी आधारलेली आहे.

- **हिंदू :**

'उपल्या' नंतर 'हिंदू' ही कादंबरी लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी लिहिली असून ती दिलीपराज प्रकाशन, पुणे यांनी २००३ मध्ये प्रकाशित केली. 'उपल्या' नंतरचा पुढील भाग म्हणून 'हिंदू' ही कादंबरी ओळखली जाते. या कादंबरीत आत्मनिवेदन आणि कादंबरी या वाङ्मय प्रकारांची सरमिसळ केलेली आहे. 'हिंदू' या कादंबरीचा हिंदी अनुवाद सूर्यनारायण रणसुभे यांनी केला असून तो दिल्लीच्या वाणी प्रकाशनाने २००४ मध्ये प्रकाशित केला, तर 'हिंदू'चा मल्याळम अनुवाद कालियम दामोदरन यांनी केला असून, ही अनुवादात्मक कादंबरी डी.सी. बुक पब्लिशर्स, कोट्टायम यांनी (२००५) मध्ये प्रकाशित केली आहे.

'हिंदू' या कादंबरीचा जन्म सामाजिक ताणतणावांच्या रसायनातून झालेला आहे. हिंदू धर्म आणि सामाजिक विषमतेचा चेहरा धारण केलेली ही कादंबरी आहे. एकिकडे उग्र हिंदुत्वाची लाट आणि दुसरीकडे त्याविरुद्ध संघटित होणारी दलितांमधील आत्मसन्मानाची जाणीव ही या कादंबरीची वीण आहे. हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेचा काळाकुट्ट चेहरा, वासना आणि विद्रोह यातील संघर्ष, दलितांमधल्या दुफळीचे, न्याय-अन्यायाचे विदारक चित्रण कादंबरीत प्रकट झालेले आहे.

- **बहुजन :**

'हिंदू' या कादंबरीनंतर तीन वर्षांनी 'बहुजन' ही कादंबरी आकारास आली. 'भिन्नलिंगी' या कादंबरीपासून त्याचा शृंखलात्मक भाग म्हणून 'उपल्या', 'हिंदू' व त्यानंतर 'बहुजन' ही कादंबरी २००६ मध्ये दिलीपराज प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केली. 'उपल्या' व 'हिंदू' कादंबरीप्रमाणेच 'बहुजन' या कादंबरीमधूनदेखील विषम हिंदू वास्तव आणि त्याविरुद्धचे उग्र दलित वास्तव यातील तफावत प्रकट झालेली दिसून येते. या चार

कादंबऱ्यांमधून शरणकुमार लिंबाळेंची भूमिका, प्रेरणा आणि बांधीलकी यामागे उभा असलेला आंबेडकरी विचारांचा प्रकाशझोत कळून येतो.

## १.४ शरणकुमार लिंबाळे यांचे काव्यलेखन :

शरणकुमार लिंबाळे यांचा कादंबरीकार म्हणून लौकिक असला तरी ते कविमनाचे साहित्यिक आहेत. त्यांनी कॉलेजचे शिक्षण घेता घेता छोटी छोटी नाटके व भीमगीते लिहिण्यास सुरुवात केली. अहमदपूरला टेलिफोन एक्सचेंजमध्ये नोकरीला असताना सुधीर गव्हाणे हे सवर्ण लेखक असूनही नामांतरवादी होते. त्यांचेही लेख दैनिक व साप्ताहिकांमधून प्रसिद्ध होत होते. सुधीर गव्हाणे या सवर्ण लेखकाने लिंबाळेंच्या लेखनास प्रोत्साहन दिले. त्यामुळे त्यांच्या लेखनास गती प्राप्त झाली. सुधीर गव्हाणेंच्या मार्फत लिंबाळेंच्या दलित कविता अस्मिता दर्शमधून प्रसिद्ध होऊ लागल्या. एक दलित कवी म्हणून लेखक शरणकुमार लिंबाळेंचा उल्लेख होऊ लागला. यातूनच त्यांचे 'काव्य' या साहित्यप्रकाराशी नाते जडले.

- **उत्पात :**

शरणकुमार लिंबाळे यांचा 'उत्पात' हा पहिला काव्यसंग्रह १९८२ मध्ये परिवर्तन प्रकाशन, अहमदपूर यांनी प्रकाशित केला. या काव्यसंग्रहावर विपुल प्रमाणात छापून आले. यातील काही कवितांचे अनुवादही झाले आहेत व काही कविता अभ्यासक्रमात लागलेल्या आहेत. या कवितासंग्रहामधील 'मी एक आंबेडकर' व 'उत्पात' या कविता चर्चित ठरल्या आहेत. याचे एकमेव कारण म्हणजे यातील कविता या आत्मटीका करणाऱ्या होत्या. दलितांमधील गटबाजी, स्वार्थ आणि लबाडीविषयी उपहास आणि उपरोधाचा सूर या कवितेतून शरणकुमार लिंबाळे प्रकट करतात. आपल्या आयुष्याची कशी वेठबिगारी झाली हे घरातल्या प्रत्येक माणसाने कशी अगतिकता सोसली होती यांचे चित्रण 'उत्पात' या काव्यसंग्रहातील 'येशू आजही' या कवितेतून करतात. तर 'पाऊलवाट' या कवितेतून जातीविषयी व प्रेमाविषयी खंत व्यक्त करताना म्हणतात –

'तुझ्या ओठावर ओठ टेकवले तेव्हा
आठवली माझी जात तेव्हा
तुझे ओठ ॲसिड वाटले
तर श्वास खारे वारे.[४]

कवी म्हणतो की माझ्यावर तिनं प्रेम केलं पण तिला माझी जात कळली तेव्हा मी गांगरलो व तीही मला सोडून गेली. आता फक्त मी तिची आठवण काढतो.

- **श्वेतपत्रिका :**

'उत्पात' या काव्यसंग्रहानंतर लेखक शरणकुमार लिंबाळेनी मधल्या सात वर्षांच्या काळात आत्मकथा आणि विविध संपादनांवर भर दिला. त्यानंतर त्यांचा दुसरा 'श्वेतपत्रिका' हा कवितासंग्रह १९८९ मध्ये प्रसिद्ध झाला.

'उत्पात' व 'श्वेतपत्रिका' या कवितासंग्रहातील कवितांमधून वाचकाला संवेदनशीलता जाणवून राहते. शरणकुमार लिंबाळे कवी म्हणून भाऊक व अंतर्मुख होऊन समाजजीवनाचा विचार करताना दिसतात. कवितेतून भूक, भीती, स्वसंरक्षण, अस्वस्थता, आक्रमण या मानवाच्या ज्या बाबी आहेत, त्यांचा विचार कवी करताना दिसतात. माणसाच्या स्वार्थी भावनेचे चित्रण, भ्रष्टाचार, आंबेडकरांच्या नावावर स्वत:चा भोगविलासूपणा, समाजमनातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक प्रश्न यांचा विचार करताना कवीने चिंतनशीलता प्रकट केली आहे. त्याचबरोबर गावकुसाबाहेरील जीवन जगणाऱ्या अस्पृश्यांविषयीचा भाव प्रकट केला आहे.

'गावकुसात वाढणारा हरेक गर्भ
जन्मत:च युद्धकैदी असतो
इथल्या गुन्हेगार टोळ्यांचा
निसर्गदत्त पाण्याचा थेंबही
पिता येत नाही अस्पृश्य म्हणून
मी पहात राहतो अथांग जलाशय गदगदून
बेअंदाज मरणाऱ्यांचे आक्रोश'[५]

## १.५ शरणकुमार लिंबाळे यांचे समीक्षालेखन :

दलित समीक्षा ही दलित साहित्याचा चिकित्सक अभ्यास करणारी वैचारिक शाखा आहे. आजपर्यंत निर्माण झालेल्या दलित साहित्याचा अभ्यास करून वामन इंगळे, यशवंत मनोहर, भालचंद्र फडके, गंगाधर पानतावणे, बाबुराव बागूल, केशव मेश्राम, प्रभाकर मांडे, शंकरराव खरात याशिवाय अनेक मराठी समीक्षकांनी दलित साहित्याची समीक्षा करून दलित साहित्याची दिशा निश्चित केली. पण याहून वेगळी अशी दलित साहित्याची, तसेच दलितेतर लेखकांनी दलितांविषयी लिहिलेल्या साहित्याची समीक्षा करून दलितेतर लेखकांच्या लेखनातील दलित जाणीवेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न शरणकुमार लिंबाळे यांनी केला आहे.

- **दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र :**

मराठी साहित्यामध्ये कथा, कविता, आत्मकथन, कादंबरी व संपादनाला महत्व देत लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी दलित साहित्याच्या समीक्षेजवळ जाणारे लेखन करून दलित साहित्याच्या समीक्षेचा अभ्यास करताना दलित साहित्यावर झालेले विचार, सभा, संमेलने, परिसंवाद इ. माध्यमांद्वारे दलित साहित्याचा विचार समजावून घेऊन दलित जाणिवांवर विशेष प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. दलित समाजाला स्वत:वर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांची, वेदनांची जाणीव करून देणे आणि सवर्ण समाजाला आपल्या व्यथा-वेदनांचे निवेदन करणे हा दलित साहित्याचा महत्वाचा हेतू आहे. दलित साहित्याच्या जीवनवादी, वास्तववादी समीक्षेची गरज ओळखून शरणकुमार लिंबाळे यांनी 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाची निर्मिती केली व या समीक्षाग्रंथातून दलित साहित्याच्या सौंदर्याची चर्चा करताना दलित साहित्याची निर्मिती, भूमिका, प्रेरणा, व्याख्या, प्रवृत्ती, स्वरुप, वैशिष्ट्ये या संदर्भात विचार केला आहे.

दलित, भटक्या, विमुक्त आणि आदिवासी यांच्या जीवनात सत्याला कोणतेच स्थान नाही. 'सत्य, शिव, सुंदर या पक्षपाती कल्पना आहेत'. याविषयी ते लिहितात, "सवर्णांनी

दलित माणसाचा स्पर्श, वाणी, सावली यांचा विटाळ मानलेला आहे. अस्पृश्याच्या स्पर्शाने अन्न, पाणी, माणूस विटाळतो. त्यासाठी त्यांच्या वस्त्या, पाणवठा, स्मशानभूमी हे सर्व वेगळे ठेवले आहे. जेणेकरून सवर्णांना त्यांचा कोणताही स्पर्श होणार नाही. यामध्ये कोणतीच समानतेची भावना दिसत नाही. दलितांनी घाणेरडी कामे करावी, धनसंचय करू नये, वेद वाचू नयेत, कारण, अस्पृश्यांना त्यांच्या शोषणाची जाणीव होईल. यासाठी त्यांनी आहे त्या परिस्थितीत जीवन जगावे; यामध्ये कोणतेच सौंदर्य असणार नाही".[६] जगामध्ये माणसाइतकी 'सत्य आणि सुंदर' अशी दुसरी कोणतीही गोष्ट नाही म्हणूनच या माणसाच्या समतेची, स्वातंत्र्याची,न्यायाची आणि बंधुभावाची चर्चा होण्यासाठीच या ग्रंथाची निर्मिती झालेली दिसून येते. 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाचे हिंदी व इंग्रजीमधून अनुवाद झालेले आहेत. लिंबाळेंनी या ग्रंथातून दलित साहित्याच्या संदर्भात उपस्थित झालेल्या आक्षेपांची, भूमिकांची व प्रश्नांची दखल घेत दलित साहित्याच्या संपूर्ण समीक्षेची चिकित्सा करून दलित साहित्याच्या सौंदर्याचा शोध घेतला आहे.

- **साहित्याचे निकष बदलावे लागतील :**

दलित साहित्याच्या सौंदर्यशास्त्राची समीक्षा करतानाच लेखक शरणकुमार लिंबाळेंनी दलित साहित्याच्या समीक्षेचा वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून विचार करताना दलित साहित्याचे स्वरुप, वेगळेपण, प्रयोजन आणि वैशिष्ट्ये या मुद्यांच्या आधारे दलित साहित्याच्या मूल्यमापनासाठी वेगळ्या निकषांची गरज ओळखून, 'साहित्याचे निकष बदलावे लागतील' या वेगळ्या समीक्षाग्रंथाची निर्मिती केली. हा समीक्षाग्रंथ दिलीपराज प्रकाशन, पुणे यांनी २००५ मध्ये प्रकाशित केला.

- **ब्राह्मण्य :**

दलित साहित्यात दलितेत्तर लेखकांनीही दलितांविषयी विपुल लेखन केलेले आहे. दलितेत्तर लेखक कल्पनेनं आणि करुणेनं दलितांविषयी जे लिहितात, त्याचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी दलितेतर लेखकांच्या दर्जेदार कलाकृतींचा अभ्यास करूनच 'ब्राह्मण्य'

या समीक्षाग्रंथाची निर्मिती केली. या समीक्षाग्रंथात दलितेतर लेखकांच्या दलितांविषयी लिहिलेल्या लेखनातील दुसरी बाजू शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. लेखक शरणकुमार लिंबाळेंच्या मते 'ब्राह्मण्य' ही एक मानसिकता आहे.[७] भारतीय समाजव्यवस्था ही जातीप्रधानतेवर अस्तित्वात असल्याने कोणताही अशिक्षित, लेखक, विचारवंत, कलावंत हे देखील याला अपवाद असू शकत नाहीत. लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी हिंदी लेखक प्रेमचंद यांच्यापासून ते मलिका शेख यांच्या आत्मकथनापर्यंत सर्व मराठी, हिंदी साहित्यातील कादंबरी, नाटक, आत्मकथा, पत्रात्मक कादंबरी यातील आदिवासी समाज, दलित समाज, ब्राह्मण समाज आणि त्यातील व्यक्तींचा चिकित्सक अभ्यास करुन दलित साहित्यातील दलितेतर लेखकांच्या लेखनाचा सूक्ष्मपणे विचार करताना ते लिहितात, "दलितेतर लेखकांच्या लेखनात जातीव्यवस्थेविषयी अपराधीपणाचा सूर व्यक्त झालेला दिसतो. अस्पृश्यांना अमानूषपणे वागवल्याची खंत या लेखनातून व्यक्त होते. 'अस्पृश्य आपले बांधव आहेत. त्यांना आपण समजून घेतले पाहिजे."[८] अशा प्रकारची प्रांजळ भावना दलितेतर लेखकांच्या साहित्यामध्ये प्रकट झालेली दिसते.

दलित साहित्यातील दलित्तेतर जाणीवेविषयी ते लिहितात. "दलितेतर जाणीव दलितांच्या प्रश्नाकडे मानवाधिकाराच्या दृष्टीने न पाहता मानवतावादाच्या दृष्टीने पाहताना दिसते. त्याबरोबरच दलितेत्तर जाणीव प्रगतीशील विचाराने प्रेरित झाली असली तरी तिच्यात ब्राह्मण्याचे विषाणू असल्याचे जाणवतात."[९] दलित साहित्याच्या नव्या दलितेत्तर जाणीवेविषयी ते पुढील सल्ला देतात, "दलितेतर लेखक सामाजिक बांधीलकी आणि पुरोगामी भूमिका घेऊन लिहितो आहे. या दोन्ही जाणीवांनी प्रेरित झालेले लेखन पुरोगामी समाज घडवण्याच्या प्रक्रियेत महत्वाचे आहे. आपल्या जातीचे संस्कार, अहंकार आणि हित यांचा विचार डोळ्यांआड करून समग्र भारतीय समाजाचा विचार होणे आवश्यक आहे."[१०] विषम व्यवस्थेतल्या कलावंत आणि विचारवंतांनी सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन व्यक्त होणे आवश्यक आहे.

लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी 'ब्राह्मण्य' या समीक्षाग्रंथातून दलितेतर लेखकांची दलितांविषयी असणारी आपुलकी पण त्यातूनही त्यांच्या लेखनात व मनामेंदूत तसूभर का होईना भिनलेले 'ब्राह्मण्य' शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.६ शरणकुमार लिंबाळे यांचे आत्मकथालेखन:

केवळ दलित साहित्यातच नव्हे तर संपूर्ण मराठी साहित्यात कथा, कादंबरी, कविता, नाटक याहीपेक्षा वेगळा ठसा उमटवणारे साहित्य म्हणजे 'आत्मकथन', आतापर्यंत अनेक दलित लेखकांनी आपली आत्मकथने लिहून दलित साहित्यात मोलाची भर घातली आहे. या आत्मकथनांमधूनच आपल्या जीवनातील चढ-उतार, जीवनात आलेले अनेक चांगले-वाईट अनुभव, ते जे जीवन जगले, त्यांनी जे भोगले त्यांनाच शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला. आतापर्यंत मराठी साहित्यात समृद्ध असलेली आत्मकथने म्हणजे, दया पवार यांचे 'बलुतं', लक्ष्मण माने यांचे 'उपरा', प्र.इ. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी', शंकरराव खरात यांचे 'तराळ - अंतराळ' या आत्मकथनांमधून लेखक आपल्या आयुष्याची आतली खोली उघडण्याचा प्रयत्न करतात. पण या सर्व आत्मकथनापेक्षा शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी' म्हणून जीवन जगताना आलेले अनुभव आणि सवर्ण समाजाकडून सहन करावा लागणारा अत्याचार याविषयीचे अनुभव 'अक्करमाशी' या आत्मकथनांमधून प्रकट केले आहेत.

लेखक आपल्या जीवनाची करुण कहाणी मांडताना आपल्या मनाचेच दर्शन घडवत नाही, तर समाजमनाचेही दर्शन घडवताना दिसतो. लिंबाळेंनी जे वाईट अनुभव भोगले ते 'अक्करमाशी' व 'बारामाशी' या दोन आत्मकथनांतून समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'अक्करमाशी' हे पहिले आत्मकथन १९८४ मध्ये श्रीविद्या प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केले तर 'बारामाशी' हे दुसरे आत्मकथन १९८८ मध्ये श्रीविद्या प्रकाशन यांनीच प्रकाशित केले. तर 'राणीमाशी' हे आत्मकथन प्रचार प्रकाशन, कोल्हापूर यांनी १९९२ मध्ये प्रकाशित केले. 'अक्करमाशी' या आत्मकथनाचे अनेक भाषांत अनुवाद झालेले आहेत.

अक्करमाशी व बारामाशी या दोन आत्मकथनांमधून लेखकाचे कौटुंबिक अनुभवविश्व वेगवेगळ्या पातळीवरून साकार होताना दिसते. 'अक्करमाशी' मध्ये महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत आलेले अनुभव साकार होतात, तर 'बारामाशी'मध्ये नोकरीनंतरचे मध्यमवर्गीय जीवन जगत असताना आलेले अनुभव पहायला मिळतात. या दोन आत्मकथनांमधून विद्रोह, नकार, उपरोधगर्भता ही त्यांच्या लिखाणाची वैशिष्ट्ये आहेत. तर अंतर्मुख होऊन वेदनेचा शोध घेण्याचा प्रयत्न हे त्यांच्या लिखाणाचे महत्वाचे लक्षण आहे. दोन भिन्न पातळीवरील कौटुंबिक अनुभव लेखक शरणकुमार लिंबाळेंनी 'अक्करमाशी' व 'बारामाशी' या आत्मकथनांमधून साकार केलेले आहेत.

अशा पद्धतीने अनेक लेखकांनी मराठी साहित्यात दलित आत्मकथनपर वाङ्मयाने आपले स्वतंत्र असे स्थान निर्माण केले पण त्याहीपेक्षा वेगळे असे स्थान शरणकुमार लिंबाळे यांनी 'अक्करमाशी' या आत्मकथनाद्वारे दलित साहित्यात निर्माण केले.

## १.७ शरणकुमार लिंबाळे यांचे कथालेखन :

शरणकुमार लिंबाळे यांचे काव्यलेखन सुरू असतानाच त्यांनी कथालेखनासही सुरुवात केली आणि त्यांनी 'बारामाशी' व 'हरिजन' हे दोन कथासंग्रह १९८८ मध्ये लिहिले. 'बारामाशी' हा कथासंग्रह श्रीविद्या प्रकाशनाने प्रकाशित केला. रथयात्रा हा त्यांचा तिसरा कथासंग्रह (१९९३) मध्ये प्रचार प्रकाशन, कोल्हापूर यांनी प्रकाशित केला. निशिकांत ठकार यांनी हिंदीत अनुवाद केलेला 'देवता आदमी' हा कथासंग्रह (१९९४) मध्ये प्रभात प्रकाशन, नवी दिल्ली यांनी प्रकाशित केला. बारामाशी, हरिजन व रथयात्रा या कथासंग्रहांतील संपूर्ण कथांचा 'दलित ब्राह्मण' हा एकच कथासंग्रह (२००४) मध्ये दिलीपराज प्रकाशनने प्रकाशित केला.

या कथासंग्रहातील कथा सामाजिक घटना व प्रसंगावर आधारलेल्या आहेत, तर काही कथा या आत्मनिवेदनांतून प्रकट झालेल्या आहेत, तसेच समाजातील चालीरिती, रुढीपरंपरा व सामाजिक समस्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न शरणकुमार लिंबाळेनी केलेला आहे.

'दलित ब्राह्मण' या कथासंग्रहामध्ये एकूण ३० कथा लिहिल्या असून त्यामध्ये तीन भाग करण्यात आले आहेत. पहिल्या भागात स्वत: लिंबाळेंनी भोगलेल्या, पाहिलेल्या सामाजिक समस्या, अत्याचार त्यांनी वेगवेगळ्या व्यक्तींच्या चित्रणांतून अनेक कथांमधून प्रकट करण्याचा प्रयत्न केला आहे. दुसऱ्या भागातील कथांमधून नोकरी करत असतानाच्या अनुभवांचा समावेश केला आहे. विशेषत: 'दलित ब्राह्मण' या कथेमधून ते एका कार्यक्रमाला गेल्यावर एका चेअरमनच्या घरी राहण्याच्या प्रसंगाचे चित्रण त्यांनी केले आहे. हा चेअरमन सुरुवातीला "आपण काही जातीभेद मानीत नाही" असे म्हणतो पण लिंबाळेंच्या नकळत त्यांनी वापरलेली भांडी व कपडे वेगळे ठेवलेली असतात. यावरुन व्यक्ती कितीही सुशिक्षित, उच्चस्तरीय असली तरी जातीयतेचा कलंक पूर्णपणे पुसला जात नाही, असे दिसून येते. तिसऱ्या भागामध्ये आपल्या जीवनात आलेल्या अनेक तरुणी म्हणजे ज्यांनी प्रेमाची स्वप्ने दाखवली व लेखकाची जात समजल्यावर आयुष्यातून दूर गेल्या याचे चित्रण केलेले आहे.

लिंबाळेंच्या कथासंग्रहांमधून मानसिक आणि शारीरिक दास्याचे चित्रण दिसून येते. दलित समाजाला भोगावे लागणारे अन्याय, अत्याचार, जातीयतेचा लागलेला कलंक यातून मनुष्याची होणारी परवड व भाकरीच्या तुकड्यासाठी करावा लागणारा संघर्ष त्यांच्या कथांमधून दिसून येतो.

## १.८ शरणकुमार लिंबाळे यांचे संपादित साहित्य :

- **दलित प्रेमकविता –**

दलित साहित्याच्या निर्मितीत आणि वृद्धीत दलित कवितेचा फार मोठा वाटा आहे. कारण, दलित साहित्याची निर्मितीच दलित कवितेने सुरू होते. सुरुवातीच्या काळात नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, दया पवार, यशवंत मनोहर, नारायण सुर्वे, राम दुतोंडे, उत्तम बावस्कर, बबन चहांदे, लहू कानडे, सुखदेव ढाणके, शशिकांत लोखंडे याबरोबरच शरणकुमार लिंबाळे, मीना गजभिये, ज्योती लांजेवार यासारख्या दलित लेखक, लेखिकांनी,

कवींनी दलित साहित्यात आपल्या कवितांद्वारे गावकुसाबाहेरील समाजावर होणारे अन्याय, अत्याचार मांडण्याचा प्रयत्न केला. पण याहीपुढे म्हणजे दलित साहित्यिकांनासुद्धा आयुष्यातील एका नाजूक क्षणाची म्हणजे प्रेमाची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. यातूनच दलित प्रेम कवितांचा जन्म झाला आणि अनेक लेखक, लेखिकांनी आपल्या प्रेमाचा उदंड आविष्कार कवितांतून व्यक्त केला.

शरणकुमार लिंबाळेनी अनेक दलित कवींच्या प्रेमकविता एकत्र करून 'दलित प्रेम कविता' हा संपादित संग्रह लिहिला व तो प्रचार प्रकाशन, कोल्हापूर यांनी १९८६ मध्ये प्रकाशित केला. यामध्ये वरील कवींच्या प्रेमकवितांचा समावेश आहे. "दलित कविता ही वेदना, विद्रोह, नकार, भूक, अज्ञान, दारिद्र्य इत्यादी वर्णनांची वैशिष्ट्ये घेऊन जन्माला आली असली तरी तीसुद्धा तेवढीच अस्मितेतून, आत्मभानातून, आत्मपीडेतून निर्माण झालेली कविता आहे. हे जेवढे खरे आहे तितकेच किंबहुना त्यापेक्षा जास्त, जीवनातील नाजूक धागा म्हणजे प्रेम यावर आधारित आहे. हे प्रेन रखरखीत वास्तवांतून फुललेले आहे. या प्रेमात फक्त तारुण्यच नाही, तर अवीट असा कारुण्याचा संघर्षही लपलेला आहे. 'दलित प्रेमकविता' एका नव्या जाणीवेचा आविष्कार आहे. याच्याच अनुभूतीतून दलित प्रेमकवितेचा उदय झाला. ज्याप्रमाणे मराठी प्रेमकविता, सूर्य, चंद्र, तारे या तीन उपमांमध्ये सामावलेली दिसून येते त्याप्रमाणे दलित प्रेमकवितेची तीन अंगे दिसून येतात, ती अशी पहिली म्हणजे ती वेगळी प्रेमकविता आहे. दुसरे न्हणजे ती सामाजिक विषमतेची प्रखर जाणीव असलेली आहे आणि तिसरे म्हणजे आपण प्रेयसी वा प्रियकर असण्यापेक्षा कार्यकर्ते अधिक आहोत असा हा सूर आहे."[११] ज्यांचे माणूसपण समाजाने नाकारलं आहे अशा समाजामुळे प्रेमापेक्षा संघर्षच अधिक निर्माण झाला आहे. श्रीमंतांनी केलेले प्रेम असते आणि दलितांनीही केलेले प्रेमच असते पण या दोन प्रेमांत फार मोठा फरक आहे. एखादा श्रीमंत माणूस आपल्या प्रेयसीसाठी सुंदरसा बंगला बांधू शकतो. पण दलित जीवनात दोन वेळच्या जेवणाचीही भ्रांत असते. एकिकडे प्रेमाच्या एका क्षणासाठी मरण स्विकारण्याचीही तयारी असते, तर दुसरीकडे जगण्यामरण्याच्या रणधुमाळीत आपल्या

प्रियेला जीवनभर संघर्षात झोकून देणारा प्रियकर असतो. म्हणून दलित प्रेमकविता दलित भावविश्वाचे सहजसुंदर विराट दर्शन असून ती एक वेगळी अनुभूती असलेली दिसून येते.

- **दलित चळवळ :**

'दलित चळवळ' या संपादित ग्रंथामध्ये लेखक शरणकुमार लिंबाळे यांनी अनेक जमातींच्या कार्यकर्त्यांचे आत्मनिवेदन प्रकट केले आहे. 'दलित चळवळ' हा संपादित ग्रंथ प्रचार प्रकाशन, कोल्हापूर यांनी (१९९१) मध्ये प्रकाशित केला. त्या ग्रंथामध्ये दलितांच्याबरोबरच गावकुसाबाहेरील अनेक जातींवर होणारे अन्याय, अत्याचार व जीवनातील संघर्ष यांचा वेध घेतला आहे.

महार, मांग, चांभार यासारख्या अनेक बहिष्कृत जातींना गावाबाहेर का होईना, स्थान आहे, वेगळा का होईना पाणवठा आहे, स्मशानभूमी आहे पण जे देशभर भटकत आहेत, जीवन जगण्यासाठी कसलाही कामधंदा करत आहेत, कधी पोटासाठी भीक मागतात, तर कधी चोरी करतात अशा भटक्या विमुक्तांची ही चळवळ आहे. त्यांचे प्रश्न, मोर्चे, चळवळी याविषयीचे चित्रण लक्ष्मण माने यांनी 'लढाई वहिवाटीसाठी' या लेखात केले आहे. या संपादित ग्रंथात लिंबाळेनी कार्यकर्त्यांच्या बाजूनेही विचार केलेला आहे. या संपादित ग्रंथातील प्रत्येक लेखांतून त्यांनी कार्यकर्त्यांची आत्मनिवेदने दिली आहेत. यामध्ये माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, नामदेव ढसाळ, उर्मिला पवार, ना.म. शिंदे, मारुती बनसोडे यासह अनेक बहिष्कृत समाजातील कार्यकर्त्यांची आत्मनिवेदने प्रकट केली आहेत. 'स्वत:च्याच हितसंबंधासाठी लढणे म्हणजे चळवळ नव्हे, तर दुसऱ्यासाठी लढणे म्हणजे खरी बांधीलकी होयं.'[१२]

अन्य लोकांचे प्रश्न, हक्क याकरिता लढण्यासाठी कार्यकर्त्याचे आयुष्य असते पण यासाठी लढतानाच कार्यकर्त्याची कशा प्रकारे कोंडी होते, यावर आत्मटिका करणारा व कार्यकर्त्याची मनोगते व्यक्त करणारा हा संपादित ग्रंथ आहे.

- **प्रज्ञासूर्य :**

१९२० ते १९५६ पर्यंतचा काळ हा बाबासाहेबांच्या वाणी, लेखणी आणि चळवळीनी भारावलेला होता. बाबासाहेबांनी आपल्या समाजाला गुलामीची जाणीव करून देण्यासाठी 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हा नोलाचा मंत्र दिला. शिक्षणामुळे आणि राखीव जागामुळे दलित तरूण शिकत होते. शासकीय योजनांमुळे, नोकऱ्यांमुळे दलितांची प्रगती होत होती आणि अनेक शिक्षित तरुणांमधून नवे लेखक तयार होऊन बाबासाहेबांनी सुरू केलेल्या नियतकालिकांमधून त्यांचे लेखन प्रकाशित होण्यास सुरुवात झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित समाजात मोठा बदल झाला. या समाजातील लोकांना गुलामीची जाणीव झाल्याने अनेक संघटना, चळवळींचा जन्म झाला. 'बाबासाहेब आंबेडकर हे एका व्यक्तीचं नाव राहिलं नसून एका विराट, विद्रोही चळवळीचे नाव झालं आहे'. बाबासाहेबांच्या तत्वज्ञानाने प्रभावीत झालेल्या अनेक विचारवंत, लेखकांनी कथा, कादंबरी व कवितांमधून, तसेच चळवळींमधून, पँथर्समधून आंबेडकरी विचारांचे प्रोत्साहन दलित समाजाला दिले; त्यामुळेच सवर्ण व दलितामध्ये सामाजिक तणाव निर्माण होऊन दलितांच्या हक्क व अधिकारांचा जन्म होत असतो. डॉ. ब्राबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे इथल्या जातीव्यवस्थेचा पायाच डळमळित झाला आहे.[१३] याचा शोध घेण्याचा प्रयत्न 'प्रज्ञासूर्य' या संपादित ग्रंथामध्ये केला आहे. हा ग्रंथ दिलीपराज प्रकाशनने प्रकाशित करून समाजापुढे प्रज्ञासूर्याच्या महतीचा गौरवच केलेला आहे.

ज्याप्रमाणे सूर्य दररोज उगवतो व मावळतो, त्याचे अस्तित्व कधीच नष्ट होत नाही, त्याप्रमाणे बहिष्कृत समाजाचा प्रज्ञासूर्य म्हणजे बाबासाहेब आंबेडकर आहेत. 'प्रज्ञासूर्य' या ग्रंथामध्ये एकूण चार विभाग केले असून पहिल्या भागात बाबासाहेबांना केंद्र मानून बुद्ध, फुले, मार्क्स, गांधीजी, माईसाहेब इत्यादींशी असलेले नाते स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला

आहे. तर बाकीच्या तीन भागांमधून बाबासाहेबांच्या जीवनकार्याच्या विविध पैलूंचा शोध घेतला आहे. अशा या प्रज्ञासूर्याच्या विविध पैलूंची प्रभा अनेक लेखांतून पसरली आहे.

- **मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह :**

मराठी वाङमयात अनेक नवनवीन प्रवाह निर्माण झाले आहेत. या प्रवाहांची सखोल माहिती होण्यासाठी शरणकुमार लिंबाळे यांनी 'मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह' हा संपादित ग्रंथ निर्माण केला आणि तो दिलीपराज प्रकाशनने १९९३ मध्ये प्रकाशित केला. मराठी साहित्यातील विचारवंत लेखकांनी आपल्या लेखनप्रवासाबरोबरच ज्यांनी समकालीन वाङमयप्रवाहाची जडणघडण आत्मीयतेने अनुभवली, जवळून पाहिली अशा लेखक समीक्षकांचा चिकित्सक चिंतनवेध या संपादित ग्रंथात घेतला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील प्रादेशिक साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी आदिवासी, बाल साहित्य इत्यादी वाङ्मयप्रवाहांची सखोल माहिती करून देणारा हा ग्रंथ आहे.

- **शतकातील दलित विचार –**

दलित साहित्याची चळवळ ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील अपूर्व आणि महत्वाची घटना आहे. हजारो वर्षे मूक राहिलेल्या दलितांच्या व्यथा, वेदना व विद्रोहाला या चळवळीने शब्दरूप दिले. अनेक सभा, संमेलने, परिसंवादांतून दलित लेखकांनी दलित साहित्याविषयी आपले विचार व्यक्त केले. त्याचा आढावा 'शतकातील दलित विचार' या संपादित ग्रंथामधून दलित वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न शरणकुमार लिंबाळे यांनी केला आहे. या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'अखिल मुंबई इलाखा महार परिषद मुंबई – १९३६' मधील बीजभाषणाचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या समाजबांधवांना सल्ला देताना म्हणतात, "तुम्ही आपणच आपला आधार व्हा, तुम्हीच स्वत:च्या बुद्धीला शरण जा ! दुसऱ्या कोणाचाही उपदेश ऐकू नका ! दुसऱ्या कोणालाही वश होऊ नका ! सत्याचा आधार घ्या ! सत्यास शरण जा ! इतर कुठेही जाऊ नका ! हा

भगवान बुद्धाचा उपदेश तुम्ही प्रसंगी ध्यानात ठेवाल तर माझी खात्री आहे की तुमचा निर्णय चुकीचा होणार नाही.[१४]

याबरोबरच १९५८ मधील दलित साहित्य संमेलन, मुंबई येथील अण्णाभाऊ साठे यांचे उद्घाटनपर भाषण, तसेच १९८९ मधील चंद्रपूर येथील पु.ल. देशपांडे यांचे साहित्य संमेलनामध्ये उद्घाटनपर भाषण व काही लेखकांच्या अध्यक्षीय भाषणांचा समावेश या ग्रंथात केला आहे. दलित लेखकांची साहित्याविषयीची भूमिका दलित साहित्याच्या जन्मप्रक्रियेशी सुसंगत अशी असल्याचे जाणवते. साहित्याकडे ते समाजप्रबोधनाचे साधन म्हणून पाहतात. ध्येयवादी लेखक जेव्हा आपल्या साहित्यात आपले जीवनसत्व ओततो, तेव्हा त्याचे शब्द शस्त्रापेक्षाही धारदार असतात, याचा प्रत्यय या ग्रंथातून येतो.

- **विवाहबाह्य संबंध : नवीन दृष्टीकोन :**

विवाहबाह्य संबंध किंवा विवाहाशिवाय संबंध हे जसे व्यक्तीचे खाजगी समांतर जीवन आहे, तशीच ती एक सामाजिक समस्या आहे. संसाराशी समांतर असलेल्या पण समाजतिरस्कृत असलेल्या या संबंधाचा सर्वांगीण शोध घेण्यासाठी शरणकुमार लिंबाळे यांनी 'विवाहबाह्य संबंध : नवीन दृष्टिकोन' हा संपादकीय ग्रंथ लिहिला व तो (१९९४) मध्ये दिलीपराज प्रकाशनने प्रकाशित केला. या ग्रंथाचे एकूण चार भागांत विभाजन केले असून पहिल्या भागात प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या विवाहबाह्य संबंधाची चर्चा केली आहे. त्यामध्ये तारा भवाळकर, शंकर सारडा, आ.ह. साळुंखे यांची मते आजमावण्याचा प्रयत्न केला आहे.

दुसऱ्या भागामध्ये विवाहबाह्य संबंधाबरोबरच स्त्रीचे व्यक्तिमत्व आणि आजचे बदलते समाजवास्तव याविषयी वेध घेण्यात आला आहे, तर तिसऱ्या भागामध्ये विवाहबाह्य संबंधाविषयी 'मला असे वाटते' या लेखात प्रामुख्याने निर्मला ठोकळ, अनुराधा गुरव, ऋषीकेश अयाचीत इ. लेखकांनी परखडपणे आपले विचार मांडले आहेत. चौथ्या

भागातून विवाहबाह्य संबंधातील संतती आणि तिचे प्रश्न याविषयी सुनिलकुमार लवटे, उत्तम कांबळे यांच्या लेखनाचा परामर्श घेतला आहे.

एकूणच या संपादित ग्रंथामधून विवाहबाह्य संबंधाची चर्चा केलेली नाही, तर आजच्या समाजातील स्थितीचे वर्णन व नेमक्या वस्तुस्थितीचा शोध घेतलेला आहे. त्याबरोबरच व्यक्तिगत समस्यांपासून सामाजिक समस्यांपर्यंतचा आढावा घेतला आहे.

- **गावकुसाबाहेरील कथा :**

दलित साहित्यात कादंबरी, नाटक, कविता याप्रमाणेच कथा हा वाङ्मयप्रकारही उदयास आला. सुरुवातीच्या काळातील दलित लेखक शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागूल यांच्या साहित्यामुळे दलित साहित्याचा पाया मजबूत झाला. विशेषत: दलित कथेची ओढ ही स्वमनापेक्षा समाजमनाकडे अधिक झुकलेली दिसते. गावकुसाबाहेरील कथा या समाजातील घटनाप्रसंगावर आधारलेल्या आहेत. अनेक दलित लेखकांनी गावकुसाबाहेरच जे जीवन जगलं आहे, अनुभवलं आहे, त्यांनाच स्वत:च्या लेखणीने शब्दबद्ध करून दलितांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांची पावतीच समाजासमोर ठेवली आहे. या कथांमधील पात्रे ही नव्या समाजरचनेच्या ध्यासाने पेटलेली आहेत. त्याबरोबरच 'स्व' चा शोध घेत संघर्ष करताना दिसतात. अशा पात्रांचा 'गावकुसाबाहेरील कथा' हा संपादित ग्रंथ शरणकुमार लिंबाळे यांनी लिहिला व दिलीपराज प्रकाशनने (१९९७) मध्ये प्रकाशित केला. अस्पृश्यांवर सार्वजनिक ठिकाणी असलेली बंदी, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, महार समाजाची बलुतेदारी याविषयी या कथा लिहिल्या असून प्रामुख्याने ग्रामीण दलित समाज या कथांमधून प्रकट होताना दिसतो.

'शंकरराव खरात यांची 'सांगावा', ही कथा म्हणजे दलितांच्या भयावह भूतकाळाची भीषण हकिकत आहे. उर्मिला पवार यांची 'भिंत' व योगीराज वाघमारे यांची 'कावळे' या कथा उपरोध आणि उपहासाने व्यक्त झाल्या आहेत. वामन होवाळ यांच्या 'नत्री

वाट' मधून रानटी प्रथेविरूद्ध बंडाचे चित्रण व्यक्त होते. या संपादित ग्रंथातील कथा या गावकुसाबाहेर वस्ती करून राहणाऱ्या अस्पृश्यतेचे दारुण दु:ख घेऊन जगताना दिसतात.[१५]

वामन होवाळ यांची 'नवी वाट' ही कथा धर्मांतराचा संदर्भ घेऊन व्यक्त होताना दिसते. देवाच्या नावाने मुले वाहण्याची प्रथा दलित समाजात होती. पोतराज, वाघ्यामुरळी, देवदासी ही या प्रथेची अनिष्ट रुपे होत. धर्मांतरामुळे अनेकांनी हिंदू देवदेवता नाकारल्या. रानटी प्रथेविरूद्ध बंड केले.[१६] या बंडाचे निनाद या कथेतून उमजतात.

## १.९ शरणकुमार लिंबाळे यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन :

शरणकुमार लिंबाळे यांच्या मते बहुजनवादी साहित्य, जनवादी साहित्य या कल्पना एकच आहेत. माणसाने जात विसरून एकमेकांशी सामंजस्याने राहिले पाहिजे. मनातील भेदभाव, जातीयता नष्ट करून प्रत्येकाने आपलेपणाचे नाते ठेवले तर समाजात कोणताच विद्रोह होणार नाही.

दलित साहित्यात उल्लेखलेले अन्याय, अत्याचार, विद्रोह, विज्ञाननिष्ठा या चतु:सूत्रीला त्यांचा विरोध नाही पण 'सत्य, शिव, सुंदर' या कल्पना ते पक्षपाती आहेत, असे मानतात. दलित समाजाकडे दलितेतर लेखकांनी तळमळीने पाहिले पाहिजे. दलितेतर लेखकांच्या लेखनाविषयी ते लिहितात, "दलितेतर लेखकांच्या लेखनात जातीव्यवस्थेविषयी अपराधीपणाचा सूर व्यक्त झालेला दिसतो. अस्पृश्यांना अमानूषपणे वागवल्याची खंत या लेखनातून दिसते. अस्पृश्य आपले बांधव आहेत. त्यांना आपण समजून घेतले पाहिजे."[१७] अशा प्रकारची प्रांजळ भावना दलितेतर लेखकांच्या साहित्यामध्ये प्रकट झालेली दिसते.

दलितेतर जाणिवेविषयी ते लिहितात, 'दलितेतर जाणीव दलितांच्या प्रश्नाकडे नानवाधिकाराच्या दृष्टीने न पाहता मानवतावादाच्या दृष्टीने पाहताना दिसते. त्याबरोबरच दलितेतर जाणीव प्रगतीशील विचाराने प्रेरित झाली असली तरी तिच्यात ब्राह्मण्याचे विषाणू असल्याचे जाणवते.[१८] १९३० ते ६० या काळात दलित लेखकांनी जे लेखन केलेले आहे, ते कारुण्यान भारलेलं आहे. सवर्ण वाचकांच्या मनात माणुसकीची भावना निर्माण करणे

आणि दलित समाजावरील अन्याय, अत्याचारांची जाणीव करून देणे असे दुधारी स्वरुप दलित साहित्यात आढळून येते. अशा प्रकारे आपणाला त्यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन दिसून येतो.

## १.१० शरणकुमार लिंबाळेंचा जीवनविषयक दृष्टिकोन :

शरणकुमार लिंबाळे यांचा जीवनविषयक दृष्टीकोन व्यापक आहे. ते जीवनाकडे गांभीर्याने पाहतात. जीवनामध्ये प्रेमाची बाब मोलाची ठरते पण मुळातच 'अक्करमाशी' म्हणून जन्माला आलेल्या लिंबाळेंना पूर्ण आयुष्यात वडिलांचे प्रेम कधी मिळालेच नाही. स्वत:च्या आईपासून सुद्धा दूर राहण्याची वेळ आपल्यावर यावी आणि आईने व्यभिचारीपणाचे जीवन जगावे ही गोष्ट लिंबाळेंना अस्वस्थ करते. एकाच आईच्या पोटी जन्म घेऊनसुद्धा पाठची भावंडे त्यांना स्विकारण्यास तयार नसतात. स्वत:च्या कुटुंबातसुद्धा त्यांना उपरेपणाची जाणीव होते, तेव्हा त्यांच्या मनाला वेदना होतात.

जीवनात शिक्षणाला महत्वाचे स्थान असल्याबद्दल ते लिहितात, 'शिक्षणामुळे मनात स्वाभिमान उफाळून येत होता. त्यावेळीच स्वाभिमान ही एक अलौकिक ताकद आहे याची मला जाणीव झालेली होती.[१९] शिक्षणामुळेच आपल्या जीवनाला समाजात एक स्थान, प्रतिष्ठा मिळाल्याचे ते सांगतात. वरील संदर्भावरून शरणकुमार लिंबाळेंच्या जीवनविषयक दृष्टीकोनाची कल्पना येते. दरिद्री, गरीब कुटुंबात जन्म होऊनसुद्धा त्यांनी शिक्षणाद्वारे आंबेडकरी विचारांनी प्रभावीत होऊन आपल्या साहित्याच्या माध्यमातून दलित साहित्यामध्ये महत्वाचे योगदान दिले आहे.

सुरुवातीला 'अक्करमाशी' या आत्मकथनाद्वारे दलित साहित्यात स्वत:ची ओळख निर्माण करणारे ते दलित लेखक ठरले. त्यांच्या 'आत्मकथनांबरोबरच त्यांच्या कादंबरी, आत्मकथा, समीक्षा इ. साहित्यांचेही इतर भाषात अनुवाद झालेले आहेत. शिवाय त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानितही केलेले आहे. लेखकाच्या साहित्यकृतींना मिळालेले पुरस्कार हे त्या लेखकाच्या साहित्यकृतीचे महत्व व श्रेष्ठत्व स्पष्ट करत असतात. त्याचबरोबर

लेखकाचे मोठेपण, अभ्यासू व्यक्तिमत्व व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन त्यातून सिद्ध होत असतो.

शरणकुमार लिंबाळे यांच्या सामाजिक आणि वाङमयीन कर्तृत्वाचा विचार करून त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

१) महाराष्ट्र सरकार, मुंबई यांच्यातर्फे १९८५ मध्ये 'अक्करमाशी' या आत्मकथनास राज्य पुरस्कार प्राप्त.

२) महाराष्ट्र साहित्य महामंडळ, मुंबई यांच्यातर्फे १९८५ मध्ये 'अक्करमाशी' या आत्मकथनास 'बा.सी. मर्ढेकर पुरस्कार'.

३) माजी विद्यार्थी संघटना, कुसूर यांच्यावतीने १९८६ मध्ये 'अक्करमाशी' या आत्मकथनास 'मुकादम' पुरस्कार.

४) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई यांच्यातर्फे १९९२ मध्ये 'राणीमाशी' या आत्मकथनास व्ही.एच. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुरस्कार प्राप्त.

५) परिवर्तन साहित्य महामंडळ, मुंबई यांच्यावतीने १९९३ मध्ये सामाजिक कार्यासाठी फुले-आंबेडकर यांच्या स्मरणार्थ पुरस्कार प्रदान.

६) ग्रामीण विकास संघटन, मुंबई, अस्मितादर्श साहित्य संमेलन चंद्रपूर यांच्यातर्फे १९९४ मध्ये अनुक्रमे उत्कृष्ट वाङमयीन लेखनासाठीचा 'फणिश्वरनाथ रेणू' पुरस्कार व 'रथयात्रा' या कथासंग्रहासाठी 'अस्मितादर्श' पुरस्कार प्राप्त.

७) मानववादी रचनामंच, जालंधर यांच्यातर्फे १९८८ मध्ये 'गुरुदास आलम' पुरस्कार प्राप्त.

८) परिवर्तन साहित्य महामंडळ, मुंबई यांच्यातर्फे दया पोवार यांच्या स्मरणार्थ पुरस्कार प्राप्त.

९) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचेतर्फे २००४ मध्ये भालचंद्र फडके पुरस्कार प्राप्त.

१०) महाराष्ट्र सरकार, मुंबई यांच्यावतीने २००४ मध्ये 'हिंदू' कादंबरीस 'राज्य पुरस्कार' प्राप्त.

११) सुशिल सोशल फोरम यांच्यातर्फे २००६ मध्ये 'सुशिल' पुरस्कार प्राप्त.

**समारोप :**

प्रकरण एकमध्ये आपण शरणकुमार लिंबाळे यांचे जीवनचरित्र व त्यांच्या वाङमयाचा परिचय करून घेतला. त्याचबरोबर त्यांच्या साहित्य प्रकारच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये स्पष्ट केली. शरणकुमार लिंबाळेंनी काव्य, कथा, कादंबरी, आत्मकथने, समीक्षा, संपादने अशा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतून लेखन केले आहे. 'अक्करमाशी' या आत्मकथनामधून त्यांच्या मनातील प्रचंड घालमेल व्यक्त होताना दिसते. या आत्मकथनामध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेत असल्यापर्यंतचे सर्व अनुभव व्यक्त होतात, तर 'बारामाशी' मध्ये नोकरीनंतरचे अनुभव पहावयास मिळतात. 'हिंदू', 'उपल्या' व 'भिन्नलिंगी' या कादंबऱ्यांमधून त्यांनी दलित चळवळ व दलित – सवर्ण संघर्षावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. 'दलित ब्राह्मण' या कथासंग्रहामधून लहानपणापासून ते लेखक होण्यापर्यंतच्या अनेक घटना, प्रसंग विविध व्यक्तींच्या व कथांच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या 'दलित प्रेमकविता' या संपादनात मराठी कवींच्या व दलित कवींच्या कवितेतील फरक जाणवून दिला आहे. मराठी कवींची कविता ही सूर्य, चंद्र, तारे, प्रेयसी व तिचे सौंदर्य या गर्तेतच सापडलेली दिसते. पण दलित कवितेत प्रेमाबरोबरच विद्रोह, नकार असलेला दिसून येतो. त्यांच्या साहित्याचे अनेक भाषांत अनुवाद झालेले आहेत. शरणकुमार लिंबाळे यांनी कथा, कादंबरी, कविता. आत्मकथने या वाङ्मयप्रकारांचे संपादन व समीक्षाही केलेल्या आहेत. परंतु या वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत त्यांचे 'कादंबरी' या वाङमयप्रकारात झालेले लेखन वेगळेपणा स्पष्ट करते. त्यांच्या कादंबऱ्यांमधून दलित – सवर्ण संघर्ष, अन्याय, अत्याचारांविरुद्ध चीड व दलित चळवळींचे चित्रण दिसून येते.

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्याने आपले स्थान निर्माण केले. त्यामध्ये ‘दलित कादंबरी’ या वाङमयाने मानवी जीवनाचे एक दुर्लक्षित रुप वास्तव स्वरुपात मांडून मराठी वाङमयाचे भांडार अधिकच समृद्ध केले आहे. अशा कादंबऱ्यांच्या अनुषंगाने पुढील प्रस्तुत प्रकरणात दलित कादंबरीच्या स्वरुपाचा अभ्यास करणार आहोत.

**निष्कर्ष :**

१) दलित साहित्यिक म्हणून शरणकुमार लिंबाळे हे महत्वाचे लेखक आहेत.

२) ‘अक्करमाशी’ म्हणून जन्माला आलेल्या या लेखकाने आपल्या साहित्याच्या रुपाने गगनभरारी मारलेली दिसून येते.

३) दलित लेखक म्हणून शरणकुमार लिंबाळे यांचे वाङमयीन कर्तृत्व श्रेष्ठ दर्जाचे असल्याचे दिसून येते.

४) त्यांनी ‘भिन्नलिंगी’, ‘उपल्या’ व ‘हिंदू’ या कादंबऱ्यांमधून दलित चळवळ व दलित समाजाच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

५) ‘अक्करमाशी’ या आत्मकथनांद्वारे त्यांनी स्वत:च्या आयुष्याची कहाणी उलगडलेली आहे शिवाय समाजातील सुसंस्कृत व सभ्य म्हणविल्या जाणाऱ्या समाजाचे वस्त्रहरणही केले आहे.

६) लेखक शरणकुमार लिंबाळे हे आत्मकथनाने नावारूपाला आले असले तरी त्यांचे सर्वात जिव्हाळ्याचे क्षेत्र कविताच असल्याचे दिसून येते.

७) ‘उत्पात आणि श्वेतपत्रिका’ या काव्यसंग्रहातून त्यांचा विद्रोही सूर जाणवून येतो.

८) त्यांची कविता केवळ आक्रोश करत नाही, तर माणसातील सहृदयतेलाही हात घालताना दिसते.

९) ‘दलित ब्राह्मण’ या कथासंग्रहातून त्यांनी दलितांच्या समस्यांचा वेध घेतला आहे.

१०) 'अस्मितादर्श' साहित्यमेळाव्याने झपाटून गेलेले शरणकुमार आपल्या स्वतंत्र लेखन प्रतिभेने साहित्यक्षेत्रात समर्थपणे उभे राहिले हे दलित साहित्य चळवळीचे यशच मानायला हवे.

११) कार्यकर्ता आणि लेखक असा मेळ शरणकुमार लिंबाळे यांच्या व्यक्तित्वात असून त्याच्या खुणा सर्वच लेखनात जाणवतात.

१२) 'दलित प्रेमकविता' या संपादनातून मराठी कवी व दलित कवींच्या कवितांतील फरक शरणकुमार लिंबाळेंनी स्पष्टपणे मांडला आहे.

## संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १) | लिंबाळे शरणकुमार | 'अक्करमाशी' दु. आवृत्ती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९९० पृ. १७ |
| २) | लिंबाळे शरणकुमार | 'भिन्नलिंगी', प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी १९९१ पृ. ६६ |
| ३) | लिंबाळे शरणकुमार | 'उपल्या', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९८ पृ. ६ |
| ४) | लिंबाळे शरणकुमार | 'उत्पात', काव्यसंग्रह, परिवर्तन प्रकाशन, अहमदपूर, प्रथम आवृत्ती, १९८२, पृ. ३० |
| ५) | लिंबाळे शरणकुमार | 'श्वेतपत्रिका' काव्यसंग्रह १९८९ पृ. ३१ |
| ६) | लिंबाळे शरणकुमार | दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, दिलीपराज प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००४. |
| ७) | लिंबाळे शरणकुमार | 'ब्राह्मण्य' दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९७, पृ. ५. |
| ८) | तत्रैव | पृ. २१३ |
| ९) | तत्रैव | पृ. २०६ |
| १०) | तत्रैव | पृ. २१४ |
| ११) | लिंबाळे शरणकुमार | दलित प्रेमकविता (संपादन), प्रचार प्रकाशन, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९८६, पृ. ६ |
| १२) | लिंबाळे शरणकुमार | दलित चळवळ, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर प्रथम आवृत्ती १९९१, प्रस्तावना |
| १३) | लिंबाळे शरणकुमार | प्रज्ञासूर्य प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९९१ पृ. ८ |
| १४) | लिंबाळे शरणकुमार | शतकातील दलित विचार, दिलीपराज प्रकाशन, पुणे २००१ पृ. ८६ |

| | | |
|---|---|---|
| १५) | लिंबाळे शरणकुमार | गावकुसाबाहेरील कथा, दिलीपराज प्रकाशन, पुणे १९९७ (पृ. ८ प्रस्तावना) |
| १६) | तत्रैव | पृ. ९ |
| १७) | लिंबाळे शरणकुमार | ब्राम्हण्य दिलीपराज प्रकाशन, पुणे २००६ पृ. प्रथमावृत्ती पृ. २१३ |
| १८) | तत्रैव | पृ. २०६ |
| १९) | लिंबाळे शरणकुमार | 'अक्करमाशी', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९० दुसरी आवृत्ती. पृ. ६२. |